# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - १३
## सभावृत्तांत

दिनांक - ५/३/२०१९ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि.५/३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा. पवार मनिषा प्रमोद
४. मा.बारणे अर्चना तानाजी
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.चंद्रकांत बारकु नखाते
९. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१०. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य
११. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.ए.के.सुपे - लेखाधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता (स्थापत्य),श्री.व्ही.बी.ओहोळ, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.डी.सुर्यवंशी - कनिष्ठ अभियंता(BRTS), श्री.बाबासाहेब गलबले - कार्यकारी अभियंता,विद्युत, श्रीमती अनुश्री कुंभार – उप अभियंता,विद्युत, श्री.पी.पी.पाटील – कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.जे व्ही पटेल – सहाय्यक उद्यान अधिक्षक इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

१) दि. ५/२/२०१९ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ११ ) कायम करणेत येत आहे.

२) दि.१६/२/२०१९ चे विशेष सभेचा सभावृत्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र.१२) कायम करणेत येत आहे.

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - १

दिनांक- ५/०३/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा. निकीता कदम यांचे दिनांक १९/१२/२०१८ चे पत्र..

मा.निकीता कदम यांचे दिनांक १९/१२/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मिलिंदनगर पिंपरी या ठिकाणी संतोषी माता मंदीरामागे सार्वजनिक वाचनालय बांधणेत यावे, तरी सदर जागा हि पालिकेच्या मालकिची असुन त्या ठिकाणी वाचनालय व समोरील बाजुस सिमेंट कॉंक्रिटीकरण करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - २

दिनांक- ५/०३/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.चंद्रकांत नखाते

संदर्भ – मा.डब्बु आसवानी (हिरानंद) यांचे दिनांक ४/०२/२०१९ चे पत्र..

ॲड.जी.डी.चांदवानी हे ग प्रभागातील नागरिक होते. ते सन १९६० मध्ये पिंपरीत वास्तव्यास आले होते. त्यांनी पिंपरी कॅम्प व सिंधी समाजासाठी खुप मोठे योगदान दिलेले होते. तरी पिंपरी शहराची व सिंधी बांधवांच्या आर्थिक प्रगतीची उभारणी करण्यासाठी त्यांच्या दुरदृष्टीने दि सेवा विकास बँकेची स्थापना त्यांनी केली व ते प्रथम बँकेचे चेअरमन असून, सन २००७ सालापर्यंत बँकेचे डायरेक्टर या पदावर कार्यरत हाते. तसेच ते स्वतंत्र सेनानी हेमु कलानी यांच्या नावांनी त्यांनी कोऑप हौ.सोसायटी स्थापन करुन त्याअंतर्गत सिंधी बांधवांच्या ऐकीला घट्ट करण्याचे कार्य देखील केले आहे.

तसेच ते समाजातील गोरगरीब लोकांसाठी मोफत न्यायालयीन कामे करायचे, ते सिटी फोरम पिंपरीचे चेअरमन होते. ते पिंपरी टेक्सटाईल्स ट्रेड असोसिएशनचे सचिव देखील होते व राष्ट्रीय सिंधी पंचायतीचे ते चेअरमन होते. असे बहुअयानी कर्तुत्ववान सामाजिक जाणिव असणारे ज्येष्ठ ॲडव्होकेट जी.डी.चांदवानी यांचे कार्य लोकांना प्रेरणा देण्यासाठी व लोकांच्या मनात त्यांच्या विषयीचा सन्मान

वाढवण्यासाठी ते वास्तव्य करीत असलेल्या ठिकाणाच्या मार्गाला/चौकाला त्यांचे स्व.ऍ़ड.गोविंदराम धालुमल चांदवानी असे नामकरण देण्यास स्थापत्य विभागाचा अभिप्राय घेऊन मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

------

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१९
दिनांक - /०३/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही